| MHAH150019062023 | केस दाखल दिनांक | | २३/१०/२०२३ |
|---|---|---|---|
| | केस नोंदणी दिनांक | | २७/१०/२०२३ |
| | केस निकाल दिनांक | | ०९/०३/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष महिने दिवस<br>०२ ०४ १३ |

## भाग अ

| | | |
|---|---|---|
| | | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, नेवासा यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी – श्रीमती संध्या यु. सुळ)**<br>**नियमित फौजदारी खटला क्र.३७५/२०२३**<br>**निशाणी क्र.४५** |
| | | गु.र.क्र.I–२९१/२०२३<br>पोलिस स्टेशन – सोनई,<br>ता. नेवासा, जि. अहमदनगर. |
| फिर्यादी | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत सोनई पोलीस स्टेशन,<br>ता. नेवासा, जि. अहमदनगर |
| प्रतिनिधीत्व | | सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.के.साबळे. |
| आरोपी | १. | **योगेश सोपान खरात,**<br>वय – ४० वर्षे, व्यवसाय – मजूरी. |
| | २. | **ज्योती योगेश खरात,**<br>वय – ३० वर्षे, व्यवसाय – मजूरी. |
| | ३. | **सुरेखा लक्ष्मण खरात,**<br>वय – २५ वर्षे, व्यवसाय – मजूरी. |
| | ४. | **रूख्मीणी उर्फ रखमाबाई सोपान खरात,**<br>वय – ६० वर्षे, व्यवसाय – मजूरी. |

| | | |
|---|---|---|
| | | सर्व रा. यशवंतनगर, सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. |
| प्रतिनिधीत्व | | आरोपींतर्फे विधीज्ञः– ॲड. श्री. ई. जी. देशमुख. |

## भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | २५/०६/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | २८/०६/२०२३ |
| दोषारोप दाखल दिनांक | २३/१०/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०२/०९/२०२५ |
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याची दिनांक | ०४/०३/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची दिनांक | –– |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | ०९/०३/२०२६ |
| शिक्षा सुनविल्याचा आदेशाची दिनांक जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | योगेश सोपान खरात, | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ प्रमाणे नोटीस दिली. | १६/१०/२०२५ | भा.द.वी.कलम ३२४, ३२३,५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | –– | –– |
| २. | ज्योती योगेश खरात, | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ प्रमाणे नोटीस दिली. | १६/१०/२०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष | –– | –– |
| ३. | सुरेखा लक्ष्मण खरात, | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ प्रमाणे नोटीस दिली. | १६/१०/२०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष | –– | –– |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | रूख्मीणी उर्फ रखमाबाई सोपान खरात, | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ प्रमाणे नोटीस दिली. | १६/१०/२०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष | -- | -- |

## भाग क

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | पोपट दारकू खरात (निशाणी ३८) | फिर्यादी |
| २. | कडूबाई पोपट खरात (निशाणी ३९) | जखमी साक्षीदार |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| ४० | घटनास्थळ पंचनामा |

### ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

### क. न्यायालयीन पुरावा –

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | -- | |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | पी. आर. क्र. ९५/२०२५ | एक ३.५ फुट लांबीचा लाकडी दांडा. |

## न्यायनिर्णय

(०९ मार्च, २०२६ रोजी घोषित)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे या गुन्ह्याकरिता चालवण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे–**

२) फिर्यादी पोपट दारकू खरात याने दिनांक २८/०६/२०२३ रोजी सोनई पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली की, दिनांक २५/०६/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेच्या सुमारास फिर्यादीची पत्नी घरासमोर भांडे घासत असतांना आरोपींना येण्याजाण्यास आडचण होते या कारणाावरून आरोपींनी फिर्यादीच्या पत्नीस शिविगाळ करून वाद घालण्यास सुरूवात केली. आरोपी योगेश याने लाकडी दांड्याने फिर्यादीच्या उजव्या हातावर मारले. इतर आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. आरोपी रखमाबाई हिने फिर्यादीच्या पत्नीस चापटाने मारहाण केली. त्यानंतर आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली.

३) सदर फिर्यादवरुन सोनई पोलीस ठाणे, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे गु.र.क्र.I–२९१/२०२३ ने भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचा तपास पो.ना. एस. ए. झांबरे यांनी केला व तपासाअंती आरोपींविरुध्द भा.द.वी. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४) आरोपींविरुध्द नि. १० लगत भा.द.वी. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह

कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केले. सदरचे दोषारोप आरोपींना मराठी भाषेत वाचुन दाखवुन समजावुन सांगीतले असता आरोपींने त्यांच्याविरुध्दचे दोषारोप नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली.

५) तसेच, आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) चे निवेदन निशाणी क्र. ४१ व ४४ खाली नोंदविण्यात आले.

६) अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. ई. जी. देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला.

७) खटल्यामधील साक्षीपुराव्याचे अवलोकन करता, प्रस्तुत खटल्याचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विचारार्थ प्रस्तुत होतात. त्यांचे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला लाकडी दांड्याने उजव्या हातावर मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचवली अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | : | नाही. |
| २. | आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला व त्याच्या पत्नीला लाथाबुक्यांनी व चापटाने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचवली असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | : | नाही. |
| ३. | आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादी व त्याच्या पत्नीला उद्देशपूर्वक शिवीगाळ करून अपमान करून त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले व अशा प्रक्षोभनामुळे त्याच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा असा त्यामागे आरोपींचा उद्देश होता असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | : | नाही. |
| ४. | आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला दमदाटी करून जीवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा केला | : | नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | | |
| ५. | आदेश काय ? | : | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता–**

८) वरील सर्व मुद्दे एकाच प्रकारच्या पुराव्यावर अवलंबुन असल्याने पुराव्याच्या विवेचनाचे पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रात विचारात घेतलेले आहेत.

९) अभियोग पक्षातर्फे तपासलेला साक्षीदार क्र. १ पोपट हा फिर्यादी आहे. त्याने साक्ष दिली आहे की, आरोपी त्याच्या शेजारी राहत असल्यामुळे तो आरोपींना ओळखतो. घटना साधारण चार ते पाच वर्षांपुर्वी दुपारी १२.०० वाजेच्या दरम्यान त्यांच्या घरासमोरील रस्त्यावर घडली. घटनेच्या वेळी आरोपीसोबत त्यांचा किरकोळ वाद झाला होता. याव्यतिरीक्त काही घडले नाही. त्याने पोलीसात तक्रार दिली होती. परंतु, त्याने फिर्यादमधील मजकूर माहित नसल्याचे कथन केले आहे. तसेच त्याने आरोपी क्र. १ ने त्याला लाकडी दांड्याने, आरोपी क्र. ४ ने त्याच्या पत्नीला चापटीने व इतर आरोपींनी लाथाबुक्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे नाकारले आहे.

१०) जखमी साक्षीदार क्र. २ कडूबाई हिने तिच्या सरतपासात कथन केले आहे की, आरोपी तिचे शेजारी राहत असल्यामुळे ती त्यांना ओळखते. फिर्यादी तिचा पती आहे. घटना साधारण चार वर्षापुर्वी दुपारी त्यांच्या घरासमोर घडली. घटनेच्या वेळी आरोपीसोबत त्यांचा किरकोळ वाद झाला होता. याव्यतिरीक्त इतर काही घडले नाही. तसेच तिने देखील आरोपी क्र. १ ने तिच्या पतीला लाकडी दांड्याने, आरोपी क्र. ४ ने तिला चापटीने व इतर आरोपींनी त्यांना

लाथाबुकयांनी मारहाण केल्याचे व जीवे मारण्याची धमकी दिल्याचे नाकारले आहे.

११) वरीलप्रमाणे फिर्यादी व जखमी साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु, त्यामध्ये त्यांनी फिर्यादमध्ये नमूद केल्याप्रमाणे घटना घडल्याचे, आरोपींने त्यांना लाकडी दांड्याने, चापटीने, लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचे व शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे नाकारले. याउलट त्यांनी मान्य केले की, आरोपी व त्यांच्यात आपसात तडजोड झाली आहे व त्यांच्यातील वाद आपसात समजूतीने मिटवलेला आहे.

१२) आरोपी व फिर्यादी यांनी त्यांच्यातील वाद आपसात समजूतीने तडजोड करुन मिटवलेला आहे. तशी पुरसीस निशाणी क्र. ३६ वर दाखल आहे. सदरची पुरसिस, फिर्यादी व जखीमी साक्षीदाराचा पुरावा या सर्व बाबींचा विचार करुन इतर कोणी साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत गुन्हा आरोपींने केला हे सिध्द करण्याकरिता अभिलेखावर कोणताही पुरावा नाही. म्हणून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. सबब, मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.५ करीता–</u>**

१३) वरील विवेचनावरुन असा निष्कर्ष निघतो की, आरोपींना प्रस्तुत गुन्ह्यात गोवण्यास कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. म्हणून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. खटल्यातील फिर्यादी व साक्षीदार यांनी त्यांच्या पुर्वीच्या जबाबाशी विसंगत साक्ष दिलेली आहे. परंतु, आरोपी व फिर्यादी यांनी आपसात समजूतीने तडजोडीने न्यायालयाबाहेर वाद मिटविला आहे. त्यामुळेच फिर्यादी व साक्षीदार यांनी त्यांच्या पुर्वीच्या जबाबाशी विसंगत साक्ष दिलेली असावी. म्हणून त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळेच फिर्यादीस प्रस्तुत

न्यायनिर्णयाची माहिती व्हावी याकरीता नोटीस पाठविण्याची आवश्यकता नाही. जप्त मुद्देमाल एक ३.५ फुट लांबीचा लाकडी दांडा हा मुल्यहिन असल्याने अपील कालावधी नंतर त्याचा नाश करणे योग्य ठरेल. सबब मुद्दा क्र. ५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | आरोपींने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रू.१०,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढयाच रकमेचे जामीन बंधपत्र सादर करावे. |
| ४. | जप्त मुद्देमाल एक ३.५ फुट लांबीचा लाकडी दांडा हा मुल्यहिन असल्याने अपील कालावधी नंतर त्याचा नाश करण्यात यावा. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.03.09 17:23:57 +0530

(संध्या यु. सुळ)

नेवासा
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

दिनांक – ०९/०३/२०२६.
न्यायालय क्र.२, नेवासा.